**<u>अंतिम हुकूमनामा क्रमांक ७/२०१७.</u>**
**<u>नि.क्र. ५७.</u>**

**<u>अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.०१ प्रविण शंकर वेडे यांचा पुढील सरतपास विधीज्ञ श्री. एस. एम. जोंधळे यांचेमार्फत शपथेवर सुरु :-</u>**

**०१.** सदरच्या प्रकरणांत मी पुरावाकामी प्रतिज्ञालेख दाखल केला असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो. **<u>नि.क्र. ५७</u>** वर आहे. सदरच्या प्रकरणांत मी माझी आई छाया शंकर वेडे हिने माझ्या हक्कात करुन दिलेले विशेष मुखत्यार पत्र दाखल केले असुन त्यावर माझी व माझ्या आईची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यामुळे, त्यास **<u>नि.क्र. ५८</u>** देण्यात येते. तसेच सदर प्रकरणात ती दस्त यादी नि. क्र.०३ सोबत रे.मु.नं.१३२/२०१२ मधील न्यायनिर्णयाची प्रमाणित प्रत दाखल केली असुन त्यास **<u>नि.क्र.५९</u>** देण्यात येतो. तसेच सदर प्रकरणात मी दावा मिळकतीचा प्रमाणित सिटी सर्व्हे उतारा दाखल केला असुन त्यास **<u>नि.क्र.६०</u>** देण्यात येते. तसेच सदर प्रकरणात मी नगरपालिकेचा प्रमाणित असेसमेंट उतारा दाखल केला असुन त्यास **<u>नि.क्र.६१</u>** देण्यात येते. तसेच सदर प्रकरणात मी रे.मु.नं.१३२/२०१२ मधील हुकूमनाम्याची प्रमाणित प्रत दाखल केली असुन त्यास **<u>नि.क्र.६२</u>** देण्यात येते.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास गैरअर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. गणपुले यांच्यामार्फत सुरु -</u>**

**०२.** न्यायालयात दावा मिळकती संदर्भात झालेल्या दाव्याबाबत व याप्रकरणाबाबतची माहिती मला माझ्या आईने दिली आहे. मला माझ्या आईने स्वत: दाखल केलेला विशेष दिवाणी दावा क्रमांक ७७/१९९९ संदर्भात काहीही माहिती नाही. हे मला माहित नाही की, त्या दाव्यासंदर्भात प्रथमत: मा. उच्च न्यायायलयात अपिल दाखल झाले व त्यानंतर ते अपिल संगमनेर जिल्हा न्यायालयात वर्ग करण्यात आले व त्याला दिवाणी अपिल क्रमांक ५७/२०१२ असा पडला. हे म्हणणे खरे आहे की, विशेष दिवाणी दावा क्रमांक ७७/१९९९ मध्ये माझ्या आईने स्वत: वाटपाची मागणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, विशेष दिवाणी दावा क्रमांक ७७/१९९९ मधील माझ्या आईने केलेली वाटपाची मागणी नामंजुर झाली. हे म्हणणे खरे आहे की, नियमित दिवाणी दावा क्रमांक १३२/२०१२ हा माझे चुलत मामा संतोष राधाकिशन मुटके यांनी दाखल केला होता. नियमित दिवाणी दावा क्रमांक १३२/२०१२ मधील कागदपत्रे मी पाहिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, नियमित दिवाणी दावा क्रमांक १३२/२०१२ मध्ये माझी आई प्रतिवादी क्र.२ होती. हे म्हणणे खरे आहे की,

नियमित दिवाणी दावा क्रमांक १३२/२०१२ माझी आई काम पाहत होती व मी स्वत: त्यात लक्ष देत नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, नियमित दिवाणी दावा क्रमांक १३२/२०१२ मध्ये माझ्या आईने प्रतिदावा दाखल केला नव्हता.

**<u>प्रश्न</u> :-** नियमित दिवाणी दावा क्रमांक १३२/२०१२ मधील न्यायनिर्णयामध्ये तुमच्या आईचा हिस्सा ठरला असला तरीही त्यात तो हिस्सा स्वतंत्र करून मिळणेबाबत आदेशपारित झालेला नाही व त्या संदर्भात तुम्ही आजपर्यंत स्टॅम्प देखील भरलेला नाही ?

**<u>उत्तर</u> :-** हे म्हणणे खरे आहे की, आम्ही आर्जपर्यंत स्टॅम्प भरलेला नाही. परंतु, पारित झालेल्या न्यायनिर्णय आम्ही पाळतो.

**०३.** हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती पुर्व-पश्चिम लांब असुन उत्तर-दक्षिण रुंदी ही लांबीपेक्षा कमी आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीत मुळत: दोन भावांचा म्हणजेचा रघुनाथ व राधाकिसन यांचा प्रत्येकी अर्धा हिस्सा आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही रघुनाथचे वारस आहोत. हे म्हणणे खरे आहे की, आजमितीस दावा मिळकतीत राधाकिसन व त्यांचा पुतण्या प्रकाश यांच्या वारसांचा ताबा आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीत आजरोजी आमचा ताबा नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीची मोजणी झाली त्यावेळी मी स्वत: उपस्थित होतो. हे म्हणणे खरे आहे की, कमिशन रिपोर्ट प्रमाणे दावा मिळकत ही पुर्व-पश्चिम ७० फुट असुन दक्षिण-उत्तर ४० फुट आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या दक्षिण बाजुला राधाकिसनच्या कुटूंबाचा ताबा आहे व उत्तर बाजुला प्रकाशचा ताबा आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या तिन्ही बाजुंनी रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, राधाकिसन व प्रकाश यांच्या हिश्याच्या मधोमध एक पाच फुट रुंदीची पुर्व-पश्चिम लांबीची सामाईक बोळ आहे. हे म्हणणे खरे आहे की, बोळ आहे त्या स्थितीत ठेवल्यास वाटपासाठी लागणारी जागा वाया जाते. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, ती बोळ रहदारीसाठी वापरली जाते. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीचे दोन हिस्से केल्यास बोळाची जागा दोघांनाही रहदारीसाठी वापरता येते. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या प्रमाणे माझ्या शपथपत्रात नमुद केले आहे.

**०४.** माझी आई सध्या घरी असते. ती कोणत्याही रुग्णालयात दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई आजारी असल्याबाबतचे कोणतेही वैद्यकीय प्रमाणपत्र मी अभिलेखावर दाखल केलेले नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, ती वयोवृध्द आहे. माझी

आई पानसरे हॉस्पीटल, संगमनेर येथे काम करीत होती. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई आजदेखील पानसरे हॉस्पीटलमध्ये काम करते. हे म्हणणे खरे नाही की, आईने दिलेल्या साक्षीत गोंधळ होवू नये म्हणुन मी स्वत: मुखत्यार पत्र करून घेवुन या प्रकरणात काम पाहत आहे.

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, दिवाणी दावा क्रमांक १३२/२०१२ मधील न्यायनिर्णयाविरूध्द जिल्हा न्यायालयात दिवाणी अपिल सुरू असुन त्याचा क्रमांक ८५/२०१६ असा आहे व ते अपिल न्यायनिर्णयाकरीता प्रलंबीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या अपिलात प्रकाश मुटके यांनी माझ्या आईला देण्यात आलेल्या हिश्याबाबत तक्रार केलेली आहे. मी सन २०21 पासुन न्यायालयात नोकरीस आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमचा कोणताही अधिकार नसतांना आम्ही निराधार असा सदरचा अंतिम हुकूमनामा प्रकरण दाखल केले आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काहीही नाही.**

**सा.वा.दा.ब.अ.क.के.**

JOSHI PRASAD BALKRISHNA
Digitally signed by JOSHI PRASAD BALKRISHNA
Date: 2026.02.13 16:03:10 +0530

**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, संगमनेर.**
**दि. १३/०२/२०२६.**

**श्रवणोत्तर स्विकृती**

JOSHI PRASAD BALKRISHNA
Digitally signed by JOSHI PRASAD BALKRISHNA
Date: 2026.02.13 16:03:04 +0530

**( प्रसाद बा. जोशी )**
**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, संगमनेर.**